Ested-1969

Principal
Dr. S. D. Pawar
M.A. Ph.D

KOYANA EDUCATION SOCIETIY'S
**BALASAHEB DESAI COLLEGE, PATAN**
Arts, Commerce, Science (UG &PG), B.C.A. & Vocational
Patan - 415206, Dist. - Satara (Maharashtra)
Phone : (02372) 283047, E-mail-str bdcp@rediffmail.com
Website: www.bdcp.edu.in
NAAC 'A+' Grade (CGPA 3.35) DST-FIST (O Level) , DBT STAR College

NAAC 'A+' Certified
ISO 9001:2015
ISO 9000:2015Certified

Ref. No./ 2023-24 Date: 04/08/2023

प्रा. डॉ. एस. आर. सुपनेकर,

संख्याशास्त्र विभाग प्रमुख,

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण

विषय: जागतिक लोकसंख्या दिन कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करणे बाबत....

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणास विनंती करण्यात येत आहे की आपण जागतिक लोकसंख्या दिनानिम्मित्त अर्थशास्त्र विभाग आणि Shivaji University Economics Association, Kolhapur (SUEAK) यांचेमार्फत आयोजित कार्यक्रमामध्ये **"भारतीय लोकसंख्येचा विस्फोट: संख्याशास्त्रीय अभ्यास आणि अर्थशास्त्रातील रोजगार संधी"** या विषयावर आमच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे ही विनंती.

**(Dr. S. D. Pawar)**
**Principal**
**Balasaheb Desai College, Patan**
**Tal.- Patan, Dist.- Satara**

Ested-1969

KOYANA EDUCATION SOCIETIY'S

**BALASAHEB DESAI COLLEGE, PATAN**

Arts, Commerce, Science (UG &PG), B.C.A. & Vocational

Patan - 415206, Dist. - Satara (Maharashtra)

Phone : (02372) 283047, E-mail-str_bdcp@rediffmail.com

Website: www.bdcp.edu.in

NAAC 'A+' Grade (CGPA 3.35) DST-FIST (O Level) , DBT STAR College

Principal
Dr. S. D. Pawar
M.A. Ph.D

NAAC 'A+' Certified
ISO 9001:2015
ISO 9000:2015Certified

Ref. No./ 2023-24 Date: 09/08/2023

प्रा. डॉ. एस. आर. सुपनेकर,

संख्याशास्त्र विभाग प्रमुख,

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण

विषय: आभाराबाबत....

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपण जागतिक लोकसंख्या दिनानिम्मित्त अर्थशास्त्र विभाग आणि Shivaji University Economics Association, Kolhapur (SUEAK) यांचेमार्फत आयोजित कार्यक्रमामध्ये **"भारतीय लोकसंख्येचा विस्फोट: संख्याशास्त्रीय अभ्यास आणि अर्थशास्त्रातील रोजगार संधी"** या विषयावर आमच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्याबद्दल आपले

**मन:पूर्वक हार्दिक आभार.**

**(Dr. S. D. Pawar)**
**Principal**
**Balasaheb Desai College, Patan**
**Tal.- Patan, Dist.- Satara**


दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज
https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# रोजगारासाठी विविध कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक : डॉ.एस.आर.सुपनेकर

**महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**

**पाटण** , दि.१० ऑगस्ट:आजच्या स्पर्धेच्या युगात जर विद्यार्थ्यांना टिकून राहायचे असेल तर आपली शैक्षणीक गुणवत्ता तर वाढवली पाहिजे पण वेगवेगळ्या कोर्स च्या माध्यमातून वेगवेगळी कौशल्ये सुद्धा आत्मसात करणे आवश्यक आहे असे मत संख्याशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस.आर. सुपनेकर यांनी व्यक्त केले. ते बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये भारतीय लोकसंख्येचा विस्फोट संख्याशास्त्रीय अभ्यास आणि अर्थशास्त्रातील रोजगार संधी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कोयना एजुकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण मध्ये अर्थशास्त्र विभाग व शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र असोसिएशन कोल्हापूर यांच्या वतीने भारतीय लोकसंख्येचा विस्फोट संख्याशास्त्रीय अभ्यास आणि अर्थशास्त्रातील रोजगार संधी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संख्याशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस.आर. सुपनेकर हे होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार होते. प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा.डॉ. प्रशांत फडणीस, डॉ.संदीप तडाखे, प्रा. अमोल मोहिते होते.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत फडणीस यांनी केले. त्यामध्ये ते म्हणाले की,आज आपण लोकसंखेच्या बाबतीत चीन या देशाला मागे टाकले आहे या लोकसंख्येचा संख्याशास्त्रीय अभ्यास आवश्यक आहे व ही माहिती विद्यार्थ्यांना समजली पाहिजे यासाठी हा कार्यक्रम घेतला आहे. .त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. एस.आर, सुपनेकर म्हणाले की, अर्थशास्त्र शाखेला भविष्यात खूप संधी आहेत आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी स्वतःचा व्यक्तिमत्व विकास केला पाहिजे त्याचबरोबर आवश्यक असणारी कौशल्य सुद्धा आत्मसात करणे आवश्यक बनले आहे. त्याच बरोबर त्यांनी जनगणना म्हणजे काय असते, जनगणना कशी केली जाते. दर १० वर्षांनी केल्या जाणाऱ्या जणगणने मध्ये फक्त माणसे मोजली जात नाहीत तर जणगणनेमध्ये लोकांचा सांस्कृतिक,



आर्थिक,सामाजिक या गोष्टींचा अभ्यास केला जातो त्यामुळे लोकांनी आपली खरी माहिती देणे आवश्यक आहे. जन्म दर आणि मृत्युदर याचाही लोकसंख्येच्या संख्याशास्त्रीय अभ्यासामध्ये फायदा होतो. अशी लोकसंख्येचा संख्याशास्त्रीय अभ्यास यावर बरीच माहिती त्यांनी सांगितली. पीपीटी च्या माध्यमातून संख्याशास्त्रीय माहिती व अर्थशास्त्र विभागच्या रोजगार संधीची माहिती सांगितली

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. एस. डी. पवार म्हणाले की नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना विषय निवडीमध्ये स्वातंत्र्य असणार आहे. ऑनलाइन शिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांना वेगवेगळे प्रकारचे मार्गदर्शन मिळाले. नवीन शैक्षणिक बदल हे स्वीकारणे गरजेचे आहे. तसेच लोकसंख्या वाढ ही समस्या असली तरी त्याचा सकारात्मक पद्धतीने विचार केला पाहिजे. कार्यक्रमाचे आभार भूगोलशास्त्र विभाग प्रमुख डॉ एस. एस. तडाखे यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी प्रा. ए.एल. मोहिते, प्रा. श्रीगणेश गायकवाड, यांच्यासह बी.ए. बी.कॉम. चे विद्यार्थी उपस्थित होते.